# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. १०७/२०२२

### पीएच्.डी. अभ्यासक्रम दुसरी प्रवेश फेरी प्रक्रिया २०२१-२२

संदर्भ : १. परिपत्रक क्र. ८३/२०२२ संदर्भ क्र. शै.प्रवेश/१९४६ दिनांक – ०७/०४/२०२२
२. परिपत्रक क्र. PGS/2274 दिनांक – २६/०४/२०२२

वरील संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने, पीएच्.डी. अभ्यासक्रम दुसरी प्रवेश फेरी प्रक्रिया २०२१-२२ साठी पीएच्.डी. मार्गदर्शक, संशोधन केंद्र यांनी रिक्त जागांचा तपशिल घोषित करण्यास व विद्यार्थांसाठी केंद्र बदलण्याच्या प्रक्रियेस मुदतवाढ दिली आहे.

परंतु अद्याप पर्यंत काही संशोधन केंद्रांनी त्यांच्या संशोधन केंद्रांवर उपलब्ध असणाऱ्या मार्गदर्शक निहाय /विषय निहाय/प्रवर्ग निहाय रिक्त जागांचा तपशिल त्यांच्या BOD Login मधुन विद्यापीठ संकेतस्थळावर विद्यार्थांसाठी उपलब्ध केलेला नाही. सबब पीएच्.डी. अभ्यासक्रम दुसरी प्रवेश फेरी प्रक्रिया २०२१-२२ साठी खालीलप्रमाणे अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

- पीएच्.डी. मार्गदर्शकांनी त्यांच्या BOD Login मधुन रिक्त जागांची माहिती ऑनलाइन पद्धतीने जमा करणे – १०/०५/२०२२ ते १४/०५/२०२२
- संबंधित संशोधन केंद्र/विद्यापीठ विभाग यांनी त्यांच्या BOD Login मधुन रिक्त जागांना मान्यता तसेच प्रवर्ग निहाय रिक्त जागा घोषित करणे - १५/०५/२०२२ ते १७/०५/२०२२
- विद्यार्थांसाठी उपलब्ध रिक्त जागांची माहिती प्रदर्शित करणे - १८/०५/२०२२
- विद्यार्थांनी उपलब्ध प्रवर्ग निहाय रिक्त जागांचा विचार करून आवश्यकता असल्यास त्यांच्या लॉगीन मधुन ऑनलाइन पद्धतीने केंद्र बदलण्याची प्रक्रिया करणे - १९/०५/२०२२ ते २३/०५/२०२२.
- विद्यापीठाकडून सर्व संबंधित विद्यापीठ विभाग व संशोधन केंद्र यांना त्यांच्या BOD Login मध्ये अद्ययावत विद्यार्थी यादी दि. २४/०५/२०२२ रोजी उपलब्ध करून देणे.
- संशोधन केंद्रांनी दि. २५/०५/२०२२ ते १०/०६/२०२२ पर्यंत मुलाखत प्रक्रिया पुर्ण करून मुलाखत अहवाल विद्यापीठाकडे जमा करावा.

मा. प्राचार्य संबंधित संशोधन केंद्र/मा. विभागप्रमुख विद्यापीठ विभाग यांना वरील प्रक्रियेत काही अडचण असल्यास व्यक्तिश:/प्रतिनिधीमार्फत शैक्षणिक प्रवेश विभागाशी संपर्क साधावा. ही अंतिम मुदतवाढ असुन यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे रिक्त जागांची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध न करणाऱ्या संबंधित संशोधन केंद्रांची पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया स्थगित ठेवण्यात येणार असून सर्व संबंधित केंद्रांनी याची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
संदर्भ : शै.प्रवेश/२४७५
दिनांक: १०/०५/२०२२

प्रत:-
मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
मा. प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

Scanned by CamScanner